र.ए.सोसायटीचे

# कै.परशुराम ग. अभ्यंकर कला व वाणिज्य
# आणि
# आर.बी.कुलकर्णी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय,
# रत्नागिरी



# माहिती पुस्तिका
## २०२४-२०२५


Email : gjcrtn@gmail.com Website : www.resociety.org

Office Contact No. 7588264348





# मनोगत

माननीय श्री. बाबुराव जोशी आणि सौ. मालतीबाई जोशी यांनी एका उदात्त, व्यापक विचारातून या संस्थेची पायाभारणी केली. या कार्याची इमारत आदर्शांच्या भक्कम पायावर उभी आहे.''एते सत्पुरुषाः परार्थ घटकाः स्वार्थान् परित्यज्य ये'' या आदर्शाचे अनुसरण करणाऱ्या जोशी दांपत्याने या संस्थेचा श्रीगणेशा केला. अवघ्या कुटुंबाचे प्रेयस-श्रेयस साधण्यासाठी कुटुंब प्रमुखाने जसे परिश्रम घ्यावे तसेच अथक परिश्रम घेऊन उभयतांनी ही संस्था आकाराला आणली आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जोशी पती-पत्नींनी शून्यातून स्वर्ग निर्माण करायचा प्रयत्न केला.

सुरवातीस १ जानेवारी १९२५ रोजी त्यांनी ३ मुलींना घेऊन आपल्या घरीच महिला विद्यालयाची स्थापना केली. हीच कोकणातील मुलींची पहिली शाळा व यातूनच संस्थेच्या कार्याचे बीजारोपण झाले. त्यानंतर १९४५ मध्ये महाविद्यालयाची आणि १९४७ मध्ये शिर्के प्रशालेची स्थापना झाली. महाराष्ट्रात शासनाच्या शैक्षणिक धोरणानुसार २ स्तरावरील अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालयामध्ये १९७६ मध्ये सुरु झाला. कालांतराने पुढे व्यावसायिक शिक्षणाची गरज लक्षात घेऊन एम.सी.व्ही.सी. विभागही सुरु झाला, विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात आता माहिती तंत्रज्ञान, कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स हे विषय सुद्धा आम्ही विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी उपलब्ध करून दिले आहेत. आज या कनिष्ठ महाविद्यालयात ३००० पेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

ज्या जोशी दांपत्याने हे छोटेसे रोप लावले, त्यांचे आम्ही आजन्म ऋणी आहोत. हे ऋण फिटणारे नाही, काही ऋणे अशी असतात की जी फेडता येत नाहीत. यांच्याकडून जे मिळाले ते वृद्धींगत करुन पुढील पिढीच्या हाती सुपूर्द करणे हाच त्यावर एकमेव उपाय असतो आणि हाच मार्ग आम्ही अनुसरतो आहोत.

डॉ. मकरंद साखळकर
प्राचार्य

# कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाच्या सूचना

१) माहितीपत्रक विद्यार्थ्यांनी, पालकांनी संपूर्णपणे वाचावे.

२) प्रत्येक परीक्षेनंतर विद्यार्थ्यांना गुणपत्रक दिले जाते. त्यावर आई / वडील / पालक यांनी सही करणे आवश्यक आहे. ते न मिळाल्यास वडील/पालक यांनी उपप्राचार्यांशी संपर्क साधावा.

३) कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य / पर्यवेक्षक यांना पालकांनी भेटण्याची वेळ निश्चित केलेली आहे. तेव्हाच पालकांनी भेटावे.

४) प्राचार्यांच्या पूर्व परवानगीने भेटण्याची वेळ ठरवता येईल.

५) कनिष्ठ महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र महाविद्यालयात स्वतःजवळ ठेवणे आवश्यक आहे.

६) किमान आवश्यक हजेरी जर पूर्ण भरली नाही तर वार्षिक परीक्षेला नियमानुसार बसता येत नाही. तसेच कोणत्याही कारणाने अनुपस्थित असल्यानंतर पालकांचे लेखी पत्र असणे आवश्यक आहे.

७) ग्रंथालय,अभ्यासिकेचा पुरेसा वापर करणे विद्यार्थ्यांच्या हिताचे आहे.

८) व्यक्तिमत्व विकासासाठी विविध क्रीडाप्रकार, एन.सी.सी., एन.एस.एस., छंदोत्सव, सांस्कृतिक स्पर्धा यामध्ये भाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांना पालकांनी प्रोत्साहन द्यावे.

९) महाविद्यालयात वेळेवर उपस्थित रहाणे, तसेच शिस्तविषयक सर्व नियमांचे पालन करण्याच्या सूचनांची, विद्यार्थ्यांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

१०) कनिष्ठ महाविद्यालयात बारावीच्या निकालात सुधारणा होण्यासाठी अनेक उपक्रम सुरु असतात त्यामध्ये विद्यार्थ्यांचा पूर्ण सहभाग असणे आवश्यक आहे.

११) महाविद्यालय परिसरात व वर्गामध्ये 'मोबाईल' वापरता येत नाही याची नोंद घ्यावी.

## : कनिष्ठ महाविद्यालयाशी संपर्क साधण्यासाठी :

महाविद्यालयाचा पत्ता –

ॲड.एन.व्ही.जोशी मार्ग, जिल्हा सत्र न्यायालयाजवळ, रत्नागिरी ४१५६१२

फोन नं. :– (०२३५२) २२१३११, २२२९९९ ,७५८८२६४३४८

फॅक्स :– (०२३५२) २२१३५३

Website : www.resociety.org

Email Id : gjcrtn@gmail.com

## संपर्क क्रमांक

| | | |
|---|---|---|
| उपप्राचार्य | – | श्री. सुनिल गोसावी<br>७०५७३७४०७५, ९४२१२३३६२५ |
| पर्यवेक्षक | – | श्री. विद्याधर केळकर<br>९४२११४३३०४ |

## विभाग प्रमुख

| | | |
|---|---|---|
| कला | – | श्री. वैभव कानिटकर<br>९४२०७३६८१३ |
| वाणिज्य | – | सौ. शिल्पा तारगांवकर<br>८७९३८३१५०६ |
| विज्ञान | – | श्री. दिलीप शिंगाडे<br>८४५९७९७७०० |
| MCVC | – | श्री. श्रीकांत दुदगीकर<br>८२०८६६८८६५ |

रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक

# कै.ज.वा.जोशी आणि मालतीबाई जोशी

सुमारे १०० वर्षांपूर्वी संपूर्ण कोंकण हा अत्यंत दुर्गम व त्यामुळे मागासलेला भाग होता. अशा रत्नागिरीमध्ये स्त्रियांच्या शिक्षणाची स्वतंत्र सोय असावी म्हणून कै. श्री. जनार्दन वामन ऊर्फ बाबुराव जोशी आणि त्यांच्या सुविद्य पत्नी कै. अण्णासाहेब कर्व्यांच्या मानसकन्या श्रीमती मालतीबाई जोशी यांनी अवघ्या तीन मुली घेऊन महिला विद्यालयाची स्थापना करुन स्त्री शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवली. घरोघरी जाऊन मुलींच्या पालकांना भेटून त्यांना स्त्री-शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन शाळेकडे वळविण्याचे अतिशय बिकट कार्य बाबुरावांनी मोठ्या चिकाटीने केले.१ जानेवारी १९२५ रोजी रत्नागिरी येथे स्थापन झालेले महिला विद्यालय हे त्या कठोर परिश्रमाचे फळ !

१९२५ ते १९३३ या काळात रत्नागिरी एज्युकेशन सोसायटी स्थापन करण्यासाठी जनतेचे प्रोत्साहन, पाठबळ मिळविण्यासाठी अथक प्रयत्न केले व १९३३ मध्ये सोसायटीची स्थापना करण्याचे स्वप्न त्यांनी साकार केले.

१९४२ साली कोकणातील पहिले मॅट्रिक परीक्षेचे केंद्र रत्नागिरीत सुरु झाले तेही बाबुरावांनी केलेल्या धडपडीमुळेच आणि १९४३ साली रत्नागिरी केंद्राला महिला विद्यालयाच्या विद्यार्थिनी प्रथम मॅट्रिकच्या परीक्षेला बसल्या.

रत्नागिरी हे मॅट्रिकचे केंद्र मिळाल्यापासूनच बाबुरावांनी ध्यास घेतला तो रत्नागिरीला कॉलेज सुरु करण्याचा. आजकालच्या काळात कॉलेज काढणे ही मोठी बाब उरली नाही. पण स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षण हे राष्ट्रवादाचे द्योतक होते. संप,मोर्चे, आंदोलने या मार्गांनी स्वातंत्र्य मिळाले तरी राष्ट्राच्या प्रगतीला सुजाण समाजाची आवश्यकता आहे अशी बाबुरावांची अनेकांप्रमाणे धारणा होती व त्यासाठी त्यांनी कॉलेज काढण्याचा ध्यास घेतला होता. रत्नागिरीसारख्या ठिकाणी कॉलेज काढण्याची कल्पना अनेक लोकांना हास्यास्पद वाटत होती. पण भारताला स्वातंत्र्य मिळण्याआधी २ वर्षे जून १९४५ साली बाबुरावांचे हे स्वप्न साकार झाले. जिल्ह्यातील हजारो गरीब होतकरु मुलांसाठी बाबुरावांनी उच्च शिक्षणाचे दरवाजे खुले केले. १९४५ साली र.प.गोगटे कॉलेज हे आर्टस् अँन्ड सायन्स कॉलेज सुरु झाले आणि उच्च शिक्षणासाठी पुणे,मुंबईच्या वाटा बंद असलेली या जिल्ह्यातील मुले जिल्ह्यात राहून पदवीधर होऊ लागली बाबुरावांच्या अथक परिश्रमांनी ही किमया घडवून आणली.

कुलकर्णी अभ्यंकर कनिष्ठ महाविद्यालय १९७६ मध्ये सुरु झाले. शासनाच्या आदेशानुसार जून १९७७ पासून इयत्ता १२ वी चे कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखांचे (S.Y.J.C.) चे वर्ग तर जून १९७८ पासून इयत्ता १२ वी बरोबर इयत्ता ११ वी चे कला, विज्ञान आणि वाणिज्य या तीन शाखांचे (F.Y.J.C) वर्ग

सुरु करण्यात आले. १९७९ पासून व्दिलक्षी व्यावसायिक अभ्यासक्रम तर १९९२ पासून **M.C.V.C.** शाखा सुरु झाली. दि. २५ मार्च १९८५ रोजी संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेचे आर.बी.कुलकर्णी ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स असे नामकरण करण्यात आले. दि. ५ ऑगस्ट १९९५ रोजी कला आणि वाणिज्य शाखेचे कै.प.ग. अभ्यंकर कला आणि वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय असे नामकरण करण्यात आले.

कै.बाबुरावांनी भगीरथ प्रयत्नांनी रत्नागिरी जिल्ह्यात ज्ञानगंगा आणली हे खरेच, पण त्यांचे मोठेपण केवळ यातच आहे असे नाही. कौटुंबिक आपत्ती असो वा संस्थेवरील आपत्ती असो, नेटाने, धैर्याने न डगमगता पुढं जाणं हा त्यांचा स्वभावविशेष होता. संस्थेसाठी पैसा गोळा करण्यासाठी सांगली, कुरुंदवाड, मिरज या संस्थानिकांचे दारी जाण्यात त्यांनी कमीपण मानले नाही. स्वतःचा प्रोजेक्टर घेऊन त्यावर सिनेमा दाखवूनही त्यांनी संस्थेसाठी पैसा उभा केला. हे सर्व करत असताना स्वतःची सांपत्तिक स्थिती चांगली असूनही संस्थेसाठी सायकलशिवाय दुसरे वाहन वापरले नाही. काटकसरीनं राहणं हे त्यांचं वैशिष्ट्य. संस्थेचा पैसा काटकसरीने खर्च करायचा म्हणून महिला विद्यालयाच्या इमारतीचे नळे पालटण्याचे कामही त्यांनी स्वतः केले होते. श्रमप्रतिष्ठेचे यापरतं दुसरं उदाहरण ते कोणतं ? महर्षी कर्वे हे कै. बाबुरावांच्या आत्याचे (बाया कर्वे) पती आणि महर्षी कर्वे हेच ह्या दांपत्याचे प्रेरणास्त्रोत होते.

रत्नागिरीत कै.बाबुरावांनी केलेले कार्य त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष देणारेच आहे. कधी काळी भविष्यात रत्नागिरी जिल्ह्याच्या नव्हे तर कोकणच्या शैक्षणिक इतिहासामध्ये कै.बाबुराव जोशी आणि कै.मालतीबाई जोशी यांची कामगिरी ही सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवावी लागेल इतकी ती प्रेरणादायी आहे आणि आजच्या परिवर्तनशील आणि आव्हानात्मक शैक्षणिक कालखंडात या दांपत्याचे स्मरण करणे आवश्यक आणि गरजेचेही आहे. त्यातूनच उद्याची शैक्षणिक आव्हाने पेलता येतील. येथे 'कोकण विद्यापीठ' स्थापन झालेच तर त्याची पायाभरणी कै.बाबुराव व कै.मालतीबाई जोशी या दांपत्यानेच केली हे प्रामाणिकपणे मान्य करावेच लागेल.

शैक्षणिक चळवळीचा हा वारसा अत्यंत समर्थपणानं, स्वकर्तृत्वाने, नियोजनबद्ध रीतीने ज्यांनी पुढे चालू ठेवला त्या **कै. ॲड. अरुअप्पा जोशी व आजवरच्या सर्व कार्याध्यक्षांचे** स्मरण आम्हाला सतत प्रेरणादायी आहे.

**डॉ. मकरंद साखळकर**
**प्राचार्य**

## ◈ ज्युनिअर कॉलेज प्रवेशासाठी पात्रता (अकरावी साठी)

निकष – इयत्ता १० वी उत्तीर्ण

१) गुणवत्ता निकष - महाविद्यालयाच्या तसेच शासनाच्या प्रवेश विषयक धोरणानुसार.

२) व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी गुणवत्ता निकष - महाविद्यालयाच्या तसेच शासनाच्या प्रवेशविषयक धोरणानुसार.

३) किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत (M.C.V.C.) **मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशियन, अकौटिंग अँड ऑफिस मॅनेजमेंट, लॉजिस्टिक अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट, इलेक्ट्रॉनिक टेक्नॉलॉजी** या विषयांचा समावेश आहे.

४) व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये I) टेक्निकल II) संगणक शास्त्र (CS) III) इलेक्ट्रॉनिक्स (ET) IV) फिश प्रोसेसिंग टेक्नॉलॉजी (FPT) असे शास्त्र विभागासाठी अभ्यासक्रम आहेत. या विभागात विद्यार्थ्यांची निवड गुणवत्तेवर व निवड प्रक्रियेनुसार होते. **त्यामधील संगणक शास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स हे विषय विनाअनुदानित आहेत. त्या विषयांची वेगळी फी आहे.**

५) शास्त्र व वाणिज्य शाखांमध्ये माहिती तंत्रज्ञान (IT) हा विषय विनाअनुदानित असून या विषयाची वेगळी फी आहे. इयत्ता ११ वी साठी वाणिज्य शाखेमध्ये IT या विषयाची स्वतंत्र गुणवत्ता यादी प्रदर्शित केली जाईल.

६) ११ वी नंतर विद्यार्थ्यांचे नांव कमी करण्याचे असल्यास ३१ मे पर्यंत नांव कमी करावे अन्यथा जून महिन्याची फी भरावी लागेल.

**१२ वी चा प्रवेश ११ वी चा निकाल जाहीर झाल्यानंतर म्हणजे ताबडतोब दिला जाईल. त्यासाठी प्रवेश अर्ज व लागू असल्यास सवलतीचा अर्ज भरणे आवश्यक आहे.**

महाविद्यालयातील शिस्त, अभ्यास, स्वाध्याय, विविध परीक्षा, अभ्यासानुवर्ती व अभ्यासेतर उपक्रमांविषयी वेळोवेळी ठरविण्यात येणारे नियम व निर्णय सर्व विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच कोणतेही नियमबाह्य बेशिस्त व अयोग्य वर्तन केल्यास संबंधिताना शासन / दंड व तत्सम इतर कारवाई होऊ शकेल याची नोंद विद्यार्थ्यांनी, तसेच पालकांनी घ्यावी.

---

## • प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या बाबी •

१) इ. ११ वीच्या प्रवेशाच्या वेळी पाल्याबरोबर पालकांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. (आई-वडील वा पालक)

२) **अकरावीत प्रवेश घेताना विद्यार्थाने प्रवेश अर्जावर जे विषय नमूद केले असतील ते नंतर बदलता येणार नाहीत.**

शाळा सोडल्याचा मूळ दाखला.(या दाखल्याखेरीज कोणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाणार नाही) सदर दाखला हे कनिष्ठ महाविद्यालय सोडून जाईपर्यंत कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.

३) ऑनलाईन अर्ज करताना हव्या असणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांसाठी टीकमार्क (✓) करावा.

४)  महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या आपल्या पाल्याचा वर्ग, तुकडी,क्रमांक, तो कोणत्या शाखेत शिकत आहे ती शाखा याची नोंद पालकांकडे असणे जरूर आहे.

५)  १२ वीच्या प्रवेशाच्या वेळी आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांच्या पालकांनी उपस्थित राहणे आवश्यक असल्यास तशी सूचना विद्यार्थ्यांना देण्याचा अधिकार प्रवेश समिती सदस्यांना आहे याची पालकांनी नोंद घ्यावी.

शालांत परीक्षेचे / उच्च माध्यमिक इयत्ता ११ वी परीक्षेचे प्रत्येक विषयातील गुण दाखविणारे मूळ गुणपत्रक असणे आवश्यक आहे.

६)  ज्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १,००,००० /- पेक्षा कमी असेल त्यांनी इ.बी.सी.फी माफीचा अर्ज व उत्पन्नाचा दाखला याची मूळ प्रत जोडावी. हा अर्ज प्रवेश अर्जाबरोबर द्यावयाचा आहे. हे सर्व प्रकारचे सवलतीचे अर्ज महाविद्यालयाच्या विद्यार्थी सहकार भांडारात मिळतील.

६.अ) फी माफीचा अर्ज विद्यार्थ्याच्या वडिलांनी करावयाचा आहे. ते हयात नसल्यास आईने, आई - वडील दोन्ही हयात नसल्यास पालकाने व पालक नसल्यास स्वतः विद्यार्थ्याने करावा व त्याप्रमाणे योग्य ती बरोबर माहिती प्रवेश अर्जात नमूद केली पाहिजे.

६.ब) आई-वडील अगर पालक राज्य सरकारी नोकरी करत असल्यास ज्या ठिकाणी नोकरीत आहेत तेथील ऑफीस प्रमुखाचा पगाराबद्दलचा दाखला असला पाहीजे. शासकीय नोकराच्या बाबतीत मूळ पगार (Basic Pay)नमूद करावयाचा आहे. मात्र खाजगी नोकरी करीत असल्यास संपूर्ण पगार नमूद करावयाचा आहे.

**कोणत्याही शाखेतील विद्यार्थ्यास विषय बदल हवा असेल तर इ. ११ वी च्या पहिल्या सत्र परीक्षेच्या आधी नियमात बसत असल्यास तो मिळू शकेल.**

**दुसऱ्या सत्रापासून ही सुविधा असणार नाही.**

**कनिष्ठ महाविद्यालयास शासन नियमानुसार विषयनिहाय मंजूर आणि उपलब्ध अध्यापक वर्ग तसेच प्रत्येक तुकडीतील शासकीय नियमांनुसार ठरवुन दिलेली विद्यार्थीसंख्या आणि त्यानुसार प्रत्येक तुकडीत कोणते विषय शिकविण्यासाठी सोय उपलब्ध करण्यात आली आहे, त्याचा संपूर्ण तपशील पुढे दिलेला आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी आपले विषय निश्चित करावेत. गुणानुक्रमानुसार एखाद्या तुकडीतील विद्यार्थीसंख्या पूर्ण भरली असल्यास, कनिष्ठ महाविद्यालयाकडून जे विषय घेण्यासाठी व ज्या तुकडीत प्रवेश घेण्यासाठी सुचविले जाईल तेथे व त्या तुकडीतच प्रवेश घेणे बंधनकारक राहिल.**

एखाद्या तुकडीत प्रवेश घेतल्यानंतर त्या तुकडीसाठी निश्चित केलेले विषयच घ्यावे लागतात याची नोंद घ्यावी. नंतर कोणालाही कोणत्याही परिस्थितीत विषय बदलून दिला जाणार नाही, याची विद्यार्थी आणि पालकांनी नोंद घ्यावी.

मागासवर्गीय शिष्यवृत्तीसाठी किंवा फी-माफीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सेतू मार्फत सक्षम प्राधिकाऱ्याच्या सहीचा जातीचा दाखला व पालकांचा मागील आर्थिक वर्षाचा सर्व मार्गांनी मिळणाऱ्या उत्पन्नाचा दाखला सेतू मार्फत मा. तहसिलदार यांचे सहीचा प्रवेश अर्जासोबत वेळीच द्यावयाचा आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून कोणतीही फी आकारली जात नाही. मात्र यासाठी प्रवेशावेळी फी माफीसाठी योग्य ती कागदपत्रे देणे आवश्यक आहे. याची विद्यार्थी / पालक यांनी नोंद घ्यावी.

मोफत शैक्षणिक सवलतीस पात्र असणाऱ्या मुलींनी फी सवलतीसाठी करावयाचा विहित नमुन्यातील अर्ज प्रवेश अर्जासोबत प्रवेशाच्यावेळी भरुन द्यावयाचा आहे फी सवलतीचे आवश्यक ते अर्ज प्रवेश अर्जासोबत देणे आवश्यक आहे. ते न दिल्यास त्याची जबाबदारी विद्यार्थी / पालक यांच्यावर राहील. वेळेवर कागदपत्रे न दिल्यास फी माफीची सवलत न मिळाल्यास सर्व फी भरावी लागेल व त्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची / पालकांची असेल.

### ❖ <u>फी माफी / शिष्यवृत्ती संदर्भातील सूचना -</u>

इतर मागासवर्गीय / मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी सवलत घेताना खालीलप्रमाणे दाखले तयार करुन घेणे गरजेचे आहे. उत्पन्नाचा दाखला हा तहसिलदार यांचाच असावा. नॉन क्रिमिलेयर दाखला,डोमिसाईल दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड इ. दाखले महाविद्यालय सुरु झाल्यानंतर लगेचच सेतू कार्यालयामार्फत काढून घ्यावे, राष्ट्रीयकृत बँकेचे खाते काढून आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न करुन ठेवणे आवश्यक आहे, ह्याची सर्व शिष्यवृत्ती धारकांनी नोंद घ्यावी.

कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने प्रवेश अर्जावर आपला अलीकडील (Recent) फोटोग्राफ (Passport Size) लावला पाहिजे. असा फोटोग्राफ नसल्यास प्रवेश मिळणार नाही.

<u>कोणत्याही विद्यार्थ्याचा प्रवेश नाकारण्याचा अधिकार प्राचार्यांना आहे.</u>

८) शासनाच्या आरक्षण नियमानुसार संबंधित विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश दिला जातो. सर्व शासकीय फी विषयक व इतर सवलती उपलब्ध आहेत याची संबंधितानी नोंद घ्यावी

### ❖ फी भरणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी

महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर शैक्षणिक फी नियमानुसार वेळेवर भरणे आवश्यक आहे. ती न भरल्यास किंवा न भरण्याचे सबळ कारण न दाखविल्यास <u>संबंधित विद्यार्थ्याचा महाविद्यालयातील प्रवेश रद्द होऊ शकेल</u> व त्याबाबतीत मागाहून कोणतीही तक्रार अगर सबब यांचा विचार केला जाणार नाही

### ❖ दुसऱ्या सत्राच्या नूतनीकरणासंबंधी

दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीला पहिल्या सत्रात प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना नूतनीकरण करणे आवश्यक असते. हा फॉर्म कार्यालयात मिळतो.

दुसऱ्या सत्राच्या प्रारंभी ठरवून दिलेल्या वेळात प्रवेश नूतनीकरण करणे आवश्यक आहे<u>. दिलेल्या मुदतीत विद्यार्थी / विद्यार्थिनीने नूतनीकरण न केल्यास त्याने / तिने कनिष्ठ महाविद्यालय सोडले आहे असे समजून त्याचे /तिचे नांव कनिष्ठ महाविद्यालयातून वेगळी सूचना न देता कमी केले जाईल व त्याची जबाबदारी संबंधितावर राहील</u>.

पालकांनी वेळोवेळी कनिष्ठ महाविद्यालयात येऊन विभाग प्रमुखांना भेटणे अत्यावश्यक आहे.

<u>महाविद्यालयातील प्रवेश रद्द करताना</u> - कनिष्ठ महाविद्यालय सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी तशा आशयाचा पालकांच्या सहीचा अर्ज प्राचार्यांकडे पाठविणे आवश्यक आहे. (महाविद्यालय सोडत असल्याचे लेखी कळविणे आवश्यक आहे. याची नोंद घ्यावी) महाविद्यालय सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुढील ३ वर्षाच्या आत आपली अनामत रक्कम परत घेण्याची व्यवस्था करावी. या मुदतीनंतर रक्कम परत दिली जाणार

नाही. विद्यार्थ्यांकडून येणे असलेली सर्व प्रकारची रक्कम अनामत रकमेतून वळती करण्याचा अधिकार महाविद्यालयाला आहे.

आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग, प्राथमिक शिक्षकांची मुले, स्वातंत्र्यसैनिकांची मुले, माजी सैनिकांची मुले, मागासवर्गीय विद्यार्थिनी इत्यादींना मिळणाऱ्या फी सवलतीपैकी कोणत्याही विद्यार्थ्याने मध्येच महाविद्यालय सोडल्यास तो ज्या सहामाहीत महाविद्यालय सोडील, त्या सहामाहीची संपूर्ण फी त्याला भरावी लागेल.

### ❖ कै. बाबुराव जोशी ग्रंथालय अभ्यासिका

कॉलेजच्या इमारतीनजीकच ग्रंथालयाची भव्य इमारत असून ग्रंथालयात विपुल ग्रंथसंग्रह असून निरनिराळी नियतकालिके व वृत्तपत्रे घेतली जातात. ग्रंथालयात अभ्यासिकाही आहे. त्याचा वापर विद्यार्थांनी करावा ही अपेक्षा आहे. प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात प्रवेशाची नोंद करणे आवश्यक आहे. ग्रंथालय कार्डावर ग्रंथपालांची सही असणे आवश्यक आहे.

### ❖ क्रीडा विभाग, एन्.सी.सी., एन.एस्.एस्., विविध गुणदर्शन

महाविद्यालयासमोर विस्तीर्ण क्रीडांगण असून तज्ज्ञ क्रीडाशिक्षक विविध खेळांचे मार्गदर्शन करतात. एन्.सी.सी. (Naval & Infantry)व एन.एस्.एस्. ची सोय आहे. वक्तृत्व लेखन, नाट्य इत्यादी गुणांच्या विकासासाठी विविध कार्यक्रम व स्पर्धा आयोजित करण्यात येतात आणि वैयक्तिक मार्गदर्शन केले जाते. तसेच शारीरिक शिक्षणाची वर्षअखेर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पर्यावरण प्रकल्प, क्षेत्र अभ्यास प्रकल्प, विषय गटनिहाय प्रकल्प पूर्ण करणे वार्षिक निकालासाठी अनिवार्य आहे.

### ❖ अध्यापक वर्ग

कॉलेजचा अध्यापक वर्ग अनुभवी व व्यासंगी असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकडे खास लक्ष पुरवितो. त्याचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा. विद्यार्थ्यांनी न समजलेल्या अभ्यासविषयक व्यक्तिगत शंका शिक्षकांना विचाराव्या ही अपेक्षा आहे.

### ❖ कमवा व शिका (आर्थिक सहाय्य - विद्यार्थी सहाय्यता निधी)

या निधीतून कनिष्ठ महाविद्यालयातील अत्यंत गरीब होतकरु व सद्वर्तनी विद्यार्थ्यांसाठी काही आर्थिक सहाय्य मिळण्याची व्यवस्था आहे. या योजनेचा फायदा घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी अर्ज करावयाचा आहे. या विषयी सूचना, सूचनाफलकावर प्रदर्शित केली जाते.

### ❖ विद्यार्थी कल्याण निधी

विद्यार्थी कल्याण निधीचा विनियोग मुख्यतः सर्व विद्यार्थांना 'विद्यार्थी सुरक्षा विमा योजनेत' समाविष्ट करुन घेण्यासाठी करण्यात येतो. या संबंधीचा आवश्यक तपशील प्रवेशाच्या वेळी मिळेल. सर्व विद्यार्थ्यांचा सुरक्षाविषयक विमा, महाविद्यालयातर्फे उतरला जातो.

### ❖ शिस्तपालन

महाविद्यालयाने केलेले शिस्तीचे सर्व नियम विद्यार्थांना बंधनकारक असुन त्यांचे पालन करणे आवश्यक आहे.

एकाग्रता, अभ्यासातील अडचणी, सातत्याने येणारे अपयश, व्यसनाधिनता, नातेसंबंधातील तणाव, चिंता या व अशा अनेक समस्यांवर विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन सुविधा उपप्राचार्य, पर्यवेक्षक , विभाग प्रमुख स्तरावर उपलब्ध आहे.

❖ लाईफ कोपिंग स्किल सेंटर -

विद्यार्थ्यांची जीवन विषय कौशल्ये विकसित करण्यासाठी, विविध उपक्रमांच्या माध्यमातून कार्यरत करण्यासाठी नवीन व्यवस्था सुरु करण्यात येत आहे.

**विद्यार्थ्याने प्रत्येक सत्रात प्रत्येक विषयाला किमान ७५ टक्के उपस्थिती ठेवणे आवश्यक आहे. जर विद्यार्थी दिवसाच्या तासापैकी कोणत्याही एक किंवा अधिक तासांना परवानगीशिवाय अनुपस्थित आढळल्यास त्याची संपूर्ण दिवसाची अनुपस्थिती मांडली जाते. पहिल्या सत्रातील उपस्थिती, अभ्यासातील प्रगती व वर्तणूक समाधानकारक नसल्यास दुसऱ्या सत्रातील प्रवेश नाकारला जाऊ शकतो.** उपस्थिती संदर्भातील सदर अट मागासवर्गीय शिष्यवृत्ती तसेच फी माफी साठी शासनाने बंधनकारक केली आहे.

दोन्ही सत्रातील एकूण हजेरी असमाधानकारक आढळल्यास त्या विद्यार्थ्याला वार्षिक / बोर्डाच्या परीक्षेला बसू दिले जात नाही. त्याचप्रमाणे ट्युटोरिअल्स, प्रकल्प, सहामाहीत व इतर परीक्षेत असमाधानकारक प्रगती आढळल्यास वार्षिक परीक्षेस बसू दिले जाणार नाही व त्याची सर्व जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यावर असते याची नोंद घ्यावी.

## पालकांसाठी सूचना

पालकांना आपल्या पाल्याची प्रगती कळावी म्हणून प्रगती पुस्तके देण्यात येतात. ती पूर्ण वाचून पालकांनी पाहून स्वाक्षरी करावी. तसेच वेळोवेळी प्राचार्यांशी / उपप्राचार्य / पर्यवेक्षकांशी संपर्क साधावा. आपल्या पाल्याच्या महाविद्यालयातील उपस्थितीबाबतही पालकांनी सातत्याने उपप्राचार्य / पर्यवेक्षकांशी / विभाग प्रमुखांशी संपर्क साधणे जरुरीचे आहे.

पालकांनी (सुट्टीचे दिवस सोडून ) आपल्या पाल्याच्या उपस्थिती संदर्भात व असमाधानकारक प्रगतीच्या संदर्भात प्रगतीपत्रक मिळताच वेळीच पर्यवेक्षक / विभाग प्रमुख / उपप्राचार्य यांना भेटून माहिती घ्यावी.

❖ **उपप्राचार्यांना भेटण्याची वेळ** – कामाच्या दिवशी सकाळी १२.०० ते १२.३० अशी निश्चित केलेली आहे. कृपया पालकांनी या वेळेतच भेटावे.

❖ विभागप्रमुखांना भेटण्याची वेळ – विज्ञान : दुपारी १२.00 ते १२.३0
वाणिज्य/कला/एमसीव्हीसी : दुपारी ३.३0 ते ४.३0

❖ पर्यवेक्षकांना भेटण्याची वेळ : दुपारी १२.00 ते १२.३0

❖ **प्राचार्यांना भेटण्याची वेळ** – कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी पूर्व परवानगीने आगाऊ ठरवून वा दररोज सायंकाळी - ४.३० ते ५.३० वाजेपर्यंत.

**कनिष्ठ महाविद्यालयामध्ये येणाऱ्या पालकांनी प्राचार्यांना भेटण्यापूर्वी प्रबंधक यांना भेटावे.**

आपल्या पाल्याचा महाविद्यालयीन प्रवेश झाल्यानंतर त्याचा वर्ग, तुकडी व हजेरीक्रमांक याची स्वतःजवळ नोंद ठेवावी. पूर्व परीक्षेपर्यंत पालकांनी पाल्याचे प्रगती संदर्भात प्रत्येक महिन्याच्या कामकाजाच्या शेवटच्या दिवशी सकाळी १० ते १२ या वेळात पर्यवेक्षक / उपप्राचार्य यांना आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष भेटावे व प्रत्यक्ष चर्चा करावी. यासाठी दूरध्वनीचा संपर्कासाठी वापर टाळणे पाल्याच्या हिताचे आहे.

## ओळखपत्र

प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र महाविद्यालयात / ग्रंथालयात / महाविद्यालयाच्या परिसरात असताना स्वतःजवळ सतत बाळगणे आवश्यक आहे.

ओळखपत्र नसल्यास त्या विद्यार्थ्याला ग्रंथालयात /वर्गात / क्रीडांगणावर इत्यादी ठिकाणी प्रवेश नाकारला जाऊ शकेल. त्याचप्रमाणे महाविद्यालयात विचारणा केल्यास

ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे. ओळखपत्रावर आपला अलीकडील (Recent) फोटोग्राफ (Passport Size) लावला पाहिजे.

महाविद्यालयात येताना प्रत्येक विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र बरोबर आणणे आवश्यक आहे. सदर ओळखपत्र मुख्य गेटवर असणाऱ्या गेटमनला दाखविल्यानंतर महाविद्यालयाच्या आवारात प्रवेश करता येईल.

मोबाईल वापर - महाविद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांना मोबाईल

---

## उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रम (MCVC)

आमच्या कनिष्ठ महाविद्यालयात केंद्रशासन पुरस्कृत अधिक दोन स्तरावरील किमान कौशल्यावर आधारीत खालील व्यवसायिक अभ्यासक्रम शिकविले जातात.

१) अकौंटिंग ॲन्ड ऑफिस मॅनेजमेंट (AOM)

२) मेडिकल लॅबोरेटरी टेक्नॉलॉजी (M.L.T)

३) लॉजिस्टिक अँड सप्लाय चेन मॅनेजमेंट (LSM)

४) इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी (E.T.)

<u>या अभ्यासक्रमांचे महत्व व ठळक वैशिष्ठ्ये खालील प्रमाणे</u> -

अ) किमान शैक्षणिक अर्हता - १० वी पास.

ब) प्रवेश क्षमता - प्रत्येक अभ्यासक्रमाकरिता फक्त २५ विद्यार्थी.

क) प्रवेशासाठी निकष - गुणवत्तेवर आधारीत.

ड) <u>प्रात्यक्षिक ज्ञान -</u>

१) विविध औद्योगिक, व्यावसायिक, सेवाभावी संस्थांना प्रत्यक्ष भेटी.

२) प्रोजेक्ट (प्रकल्प)

३) तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने.

४) शिकाऊ उमेदवारी कायद्यानुसार अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर शिकाऊ उमेदवारीची तरतुद.

५) शिकाऊ उमेदवारी कालावधीत सरकारी नियमानुसार विद्यावेतन मिळण्यास पात्र.

ई) <u>स्वयंरोजगार -</u> अभ्यासक्रम पूर्ततेनंतर विद्यार्थी आपला स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी स्वयंसिद्ध होतात.

फ) वाणिज्यविषयक व्यावसायिक अभ्यासक्रमानंतर (AOM & LSM) प्रथम वर्ष बी.एम्. एस्., बी.कॉम. अकौटिंग ॲन्ड फायनान्स, वाणिज्य(F.Y.B.Com) वर्गात प्रवेश मिळू शकतो. M.L.T. / ET हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर (F.Y.B.A./F.Y.B.Sc) या वर्गात प्रवेश मिळू शकतो. तसेच वरीलपैकी सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना १२ वी नंतर B.Com, BMS, (A/C & Fin.) व पाचवर्षीय एल्.एल्.बी. (LLB) अभ्यासक्रमास प्रवेश मिळू शकतो.

ग) या अभ्यासक्रमांतर्गत कॉम्प्युटर प्रशिक्षणाची (सशुल्क) आवश्यकतेनुसार सोय उपलब्ध.

घ) पदवी अभ्यासक्रमासाठी व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील विद्यार्थ्यांना नियमानुसार प्रवेश उपलब्ध आहे.

# HSC Vocational (M.C.V.C) प्रत्येक अभ्यासक्रमाचे स्वरुप

## LOGISTIC & SUPPLY CHAIN MANAGEMENT (PSK) :

| XI | XII |
|---|---|
| 1 English | 1 English |
| 2 Foundation Course | 2 Foundation Course |
| 3 Marathi | 3 Marathi |
| 4 Pr. I - Purchase Management | 4 Pr. I - Retail Management |
| 5 Pr.II - Banking Insurance & Financial Services | 5 Pr.II - Security & Safety Equipments |
| 6 Pr.III - Transport Management | 6 Pr.III -Supply Chain Management |

## MEDICAL LABORATORY TECHNOLOGY :

| XI | XII |
|---|---|
| 1 English | 1 English |
| 2 Foundation Course | 2 Foundation Course |
| 3 Marathi | 3 Marathi |
| 4 Pr.I - Anatomy & Physiology | 4 Clinical Haematology Clinical Pathology & Blood Banking |
| 5 Pr.II - Laboratory Management Ethics | 4 Histotechnology |
| 6 Pr.III - Microbiology | 4 Clinical Biochemistry |

## ELECTRONICS TECHNOLOGY :

| XI | XII |
|---|---|
| 1 English | 1 English |
| 2 Foundation Course | 2 Foundation Course |
| 3 Marathi | 3 Marathi |
| 4 Basic Electricity | 4 Applied & Industrial Electronics |
| 5 Basic Electronics | 5 Modern Instrumental & Communication System |
| 6 Digital Electronics | 6 Computer Hardware & Networking |

## ACCOUNTING & OFFICE MANAGEMENT : (ACCOUNTING & AUDITING)

| XI | XII |
|---|---|
| 1 English | 1 English |
| 2 Foundation Course | 2 Foundation Course |
| 3 Marathi | 3 Marathi |
| 4 Office Management & Organisation | 4 Office Motivation & Automation |
| 5 Fundamentals of Accounting | 5 Advanced Financial Accounting |
| 6 Fundamentals of Costing & Auditing | 6 Advance Costing & Auditing |

इ. ११ वी/१२ वी कला/ वाणिज्य / विज्ञान या शाखांतर्गत कोणत्या तुकडीसाठी कोणते विषय घेणे आवश्यक आहे त्याचा तक्ता –

## कला/ वाणिज्य / विज्ञान या शाखांमध्ये शिकविले जाणारे विषय

### कला शाखा - XI / XII

| अ (अनुदानित) | ब (अनुदानित) | क (अनुदानित) |
|---|---|---|
| *मराठी माध्यम* | *मराठी माध्यम* | *मराठी माध्यम* |
| १) इंग्रजी | १) इंग्रजी | १) इंग्रजी |
| २) मराठी | २) मराठी | २) मराठी / उर्दु |
| ३) हिंदी/संस्कृत | ३) हिंदी | ३) हिंदी |
| ४) समाजशास्त्र | ४) इतिहास | ४) भूगोल |
| ५) मानसशास्त्र /भूगोल | ५) मानसशास्त्र /भूगोल | ५) समाजशास्त्र/इतिहास |
| ६) अर्थशास्त्र | ६) अर्थशास्त्र | ६) अर्थशास्त्र |
| ७) पर्यावरण | ७) पर्यावरण | ७) पर्यावरण |
| ८) शा.शिक्षण | ८) शा.शिक्षण | ८) शा.शिक्षण |

### विज्ञान शाखा - XI / XII

| *अ (अनुदानित)* | ब(अनुदानित) | क(अनुदानित) | ड (अनुदानित) | इ *(विनाअनुदानित)* |
|---|---|---|---|---|
| १) इंग्रजी | १) इंग्रजी | १) इंग्रजी | १) इंग्रजी | १) इंग्रजी |
| २) भौतिकशास्त्र | २) भौतिकशास्त्र | २) भौतिकशास्त्र | २) भौतिकशास्त्र | २) भौतिकशास्त्र |
| ३) रसायनशास्त्र | ३) रसायनशास्त्र | ३) रसायनशास्त्र | ३) रसायनशास्त्र | ३) रसायनशास्त्र |
| ४) गणित | ४) गणित /भूगोल | ४) गणित/ जीवशास्त्र | ४) गणित | ४) गणित /भूगोल |
| ५) जीवशास्त्र / कॉम्प्यु.साय I / इलेक्ट्रानिक्स I | ५) जीवशास्त्र | ५) मत्स्यप्रक्रिया तंत्र. I मेकॅनिकल मेंटेनन्स I / इलेक्ट्रीकल मेंटेनन्स I | ५) जीवशास्त्र | ५) जीवशास्त्र |
| ६) संस्कृत/ मराठी /हिंदी /कॉम्प्यु.साय II / इलेक्ट्रानिक्स II | ६) मराठी /हिंदी /संस्कृत / उर्दू | ६) मेकॅनिकल मेंटेनन्स II / इलेक्ट्रीकल मेंटेनन्स II मत्स्यप्रक्रिया तंत्र. II | ६) आय.टी. | ६) मराठी /हिंदी /संस्कृत / उर्दू |
| ७) पर्यावरण | ७) पर्यावरण | ७) पर्यावरण | ७) पर्यावरण | ७) पर्यावरण |
| ८) शा.शिक्षण | ८) शा.शिक्षण | ८) शा.शिक्षण | ८) शा.शिक्षण | ८) शा.शिक्षण |

## वाणिज्य शाखा - XI / XII

| अ (अनुदानित) (इंग्रजी माध्यम) | ब (अनुदानित) (मराठी माध्यम) | क (अनुदानित) (इंग्रजी माध्यम) | ड (स्वयंअर्थसहाय्यित) (इंग्रजी माध्यम) |
|---|---|---|---|
| १) इंग्रजी | १) इंग्रजी | १) इंग्रजी | १) इंग्रजी |
| २) अर्थशास्त्र | २) अर्थशास्त्र | २) अर्थशास्त्र | २) अर्थशास्त्र |
| ३) वाणिज्य संघटन व व्यवस्थापन | ३) वाणिज्य संघटन व व्यवस्थापन | ३) वाणिज्य संघटन व व्यवस्थापन | ३) वाणिज्य संघटन व व्यवस्थापन |
| ४) गणित / चिटणीसाचा व्यवसाय (एस.पी.) | ४) चिटणीसाचा व्यवसाय (एस.पी.) | ४) गणित / चिटणीसाचा व्यवसाय (एस.पी.) | ४) गणित / चिटणीसाचा व्यवसाय (एस.पी.) |
| ५) अकौटंसी | ५) अकौटंसी | ५) अकौटंसी | ५) अकौटंसी |
| ६) मराठी/हिंदी संस्कृत/आय.टी. | ६) मराठी/उर्दू | ६) मराठी/हिंदी /उर्दू/ संस्कृत/आय.टी. | ६) मराठी/हिंदी |
| ७) पर्यावरण | ७) पर्यावरण | ७) पर्यावरण | ७) पर्यावरण |
| ८) शा.शिक्षण | ८) शा.शिक्षण | ८) शा.शिक्षण | ८) शा.शिक्षण |

## सूचना -

1) टेक्निकल विषयात निवड झालेल्या विद्यार्थ्यांना दोन दिवस, राजिवडा येथे शासकीय संस्थेत थिअरी व प्रॅक्टीकलसाठी जावे लागते.

2) आय. टी., इलेक्ट्रॉनिक्स व कॉम्प्युटर सायन्स हे विषय विनाअनुदानित असल्याने त्यांची वेगळी फी भरावी लागते. प्रवेशाची वेळी त्याची माहिती घ्यावी.

3) अकरावी व बारावी विज्ञान 'इ' या तुकड्या अंशतः अनुदानित असल्याने प्रवेश घेताना वेगळी फी भरावी लागेल.

4) अकरावी वाणिज्य 'ड' व बारावी वाणिज्य 'ड' या तुकड्या स्वयंअर्थसहाय्यीत असल्याने प्रवेश घेताना वेगळी फी भरावी लागेल.

5) 11 वी आणि 12 वी च्या कला, विज्ञान, वाणिज्य आणि एम.सी.व्ही.सी विभागातील विद्यार्थांना पर्यावरण हा विषय अनिवार्य आहे.

6) वह्या, प्रोजेक्ट फाईल्स, ॲप्रन, जरनल्स महाविद्यालयाच्या विद्यार्थी भांडारातून उपलब्ध करुन दिल्या जातील.

## ● विशेष सूचना ●

वाढती विद्यार्थी संख्या, विविध अभ्यासेतर उपक्रमातील मोठ्या प्रमाणामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनींचे दैनंदिन अभ्यासाच्या तासिका / प्रात्यक्षिके यांचे होणारे शैक्षणिक नुकसान लक्षात घेता महाविद्यालयाचे शैक्षणिक कामकाज पुढीलप्रमाणे होत आहे याची नोंद घ्यावी.

**कनिष्ठ महाविद्यालय -**

शास्त्र / कला / वाणिज्य / एम्.सी.व्ही.सी. ११ वी /१२ वी चे सर्व वर्ग – दुपारी १२. ३० पासून सुरु होतील.

सर्व वर्गांचे सविस्तर वेळापत्रक प्रवेशाच्या वेळी उपलब्ध होईल. तसेच वेळापत्रकाविषयीची आणखी माहिती उपप्राचार्यांकडे उपलब्ध होईल.

- ❖ तोंडी परीक्षा वेळापत्रक दिल्यानंतर वेळत देणे ही विद्यार्थ्यांची जबाबदारी असेल.
- ❖ EVS परीक्षा व PE परीक्षा तसेच ज्या विषयांना प्रोजेक्ट आहेत त्या विषयांना Out of turn नसलेने विद्यार्थ्याने व पालकांनी लक्ष देणे.
- ❖ इ. 12 वी च्या विद्यार्थ्यांनी बोर्डाची Pre-List काळजीपूर्वक तपासावी.
- ❖ कॉलेज कॅम्पस मध्ये I-card गळयात असणे सक्तीचे आहे.
- ❖ पालकांनी प्रत्येक परीक्षेनंतर एकदातरी प्रत्यक्षात विभागप्रमुखांना येऊन भेटणे आवश्यक आहे.

## विषय बदल

कोणत्याही शाखेतील विषय बदल करावयाचा असेल तर तो अकरावीत पहिल्या सत्रातच करावा लागेल. त्यानंतर तो विषय बदलून दिला जाणार नाही. बारावीत विषय बदल करता येणार नाही.



# छंदोत्सव



विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी देणारे आणि भविष्यात करिअरसाठी उपयुक्त ठरणारे एकमेव व्यासपीठ म्हणजे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात दरवर्षी साजरा होणारा छंदोत्सव. हा छंदोत्सव विद्यार्थ्यांच्या छंदांना आविष्कृत करण्यासाठी प्रोत्साहन देणारा आहे. दरवर्षी डिसेंबरमध्ये या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

गीत–गायन, मूकाभिनय, नाट्यप्रवेश, फॅन्सीड्रेस, समूहनृत्य, वैयक्तिक नृत्य, कथाकथन, काव्यवाचन, शास्त्रीय संगीत, वाद्यसंगीत अशा विविध स्वरुपाच्या स्पर्धा, पेंटींग, पोस्टर, छायाचित्रण, रीलमेकींग, कोलाज, रांगोळी, फाईन आर्टस, फूड फेस्टीव्हल अशा प्रकारच्या स्पर्धा या महोत्सवात संपन्न होतात.

या महोत्सवांतर्गत शामराव करंडक एकांकिका स्पर्धा घेतली जाते. ही स्पर्धा गेली २६ वर्षे सुरु आहे. या स्पर्धेचा विशेष भाग म्हणजे लेखन, दिग्दर्शन, नेपथ्य, संगीत, पार्श्वसंगीत, प्रकाश योजना हे सर्व घटक विद्यार्थीच सांभाळतात. उत्साहाने त्यात भाग घेतात. **शब्द एक आविष्कार अनेक** असे या एकांकिकेचे स्वरुप असते. दरवर्षी या एकांकिकेसाठी एक शब्द दिला जातो. विद्यार्थी त्या शब्दावर आधारित असे एकांकिकेचे लेखन करतो आणि त्या एकांकिकेचे सादरीकरण होते, यापैकी निवडक एकांकिका विविध ठिकाणी यश मिळवितात. रंगमंचावरील सर्व घटकांना पारितोषिके देणारी ही प्रतिष्ठेची, सन्मानाची एकांकिका स्पर्धा आहे.

या वर्षी ''अस्तित्व'' या शब्दावर आधारित एकांकिका स्पर्धा सादर होणार आहे. डिसेंबर मध्ये होणाऱ्या या स्पर्धेसाठी पूर्वतयारी करण्यासाठी वेळ मिळावा म्हणून आत्तापासून हा शब्द देत आहोत.

विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरसाठी उपयुक्त ठरण्याऱ्या विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये सहभाग घ्यावा यासाठी हे आवाहन !

## ◈ महाविद्यालयाची वसतिगृहे

महाविद्यालयाच्या वसतिगृहामध्ये १८० विद्यार्थी व २०० विद्यार्थिनींची रहाण्याची सोय आहे. विद्यार्थी व विद्यार्थिनी वसतिगृहात निवास व भोजनाची व्यवस्था आहे. दोन्ही वसतिगृह इमारती सुसज्ज व हवेशीर असून महाविद्यालयाशेजारीच आहेत. महाविद्यालय, वाचनालय, ग्रंथालय, क्रीडांगण ही सर्व महाविद्यालयानजिकच असल्यामुळे विद्यार्थी, विद्यार्थिनींना अतिशय सोयीस्कर आहेत. वसतिगृह प्रवेशाच्या अर्जाचा नमुना महाविद्यालयाच्या कार्यालयामध्ये मिळेल. वसतिगृहात प्रवेश घेण्यासाटी येताना सोबत पालकांनी येणे आवश्यक आहे. वसतिगृहात राहण्यासंबंधीची नियमावली कार्यालयात मिळेल. त्या नियमांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. नियमभंग केल्यास गंभीर दखल घेतली जाईल. अर्ज पाठविला व फी भरली म्हणजे वसतिगृहात प्रवेश मिळेलच असे नाही. प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांने त्याबद्दल प्रत्यक्ष भेटून प्रवेश निश्चित करावा. वसतिगृहात प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना / विद्यार्थिनींना आपला एक फोटो वसतिगृह प्रमुखांना सादर करावयाचा आहे. प्रत्येक सत्राच्या आरंभी वसतिगृहाच्या खोलीचे वाटप वसतिगृह प्रमुख करतील. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असणारे नियम व वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचना यांचे पालन बंधनकारक आहे.

वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांनी वा पालकांनी वसतिगृहाच्या नियमांचा विशेषतःपाल्यांना भेटण्याच्या वेळासंबंधीच्या नियमांचा परिचय करुन घ्यावा, व तशी वर्तणूक ठेवावी.

वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी / विद्यार्थिनींनी महाविद्यालय परिसरातील महाराष्ट्र बँकेत स्वतःचे खाते उघडावे. सुट्टीमध्ये वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा आकार द्यावा लागतो. विद्यार्थी / विद्यार्थिनी यांनी वसतीगृहातील भोजनगृहातच भोजन घेणे अनिवार्य आहे. स्वतःची चीजवस्तूंची जबाबदारी वैयक्तिक विद्यार्थी / विद्यार्थिनींची आहे. तसेच वसतिगृहामध्ये विद्यार्थी / विद्यार्थिनींच्या ताब्यात दिलेल्या सामानाची मोड-तोड किंवा नासधुस झाल्यास त्याची नुकसान - भरपाई संबंधित विद्यार्थी / विद्यार्थिनींकडून घेतली जाते. तसेच इमारती, दरवाजे, खिडक्या इ. ची मोडतोड, नासधूस केल्यास नुकसान भरपाई द्यावी लागते. वसतिगृहात वैयक्तिक रेडिओ, टी.व्ही, हीटर, इस्त्री इ. चा वापर करण्यास सक्त मनाई आहे. वरील वस्तुंचा वापर केल्याचे आढळल्यास वसतिगृह प्रवेश आपोआप रद्द केला जातो व योग्य ती कारवाईही केली जाते.

R.E.Society's
SUYASH ACADEMY
In The Pursuit of Success
Supported by ZAP learning solutions, KOTA

# सुयश अकॅडमी

करिअर म्हटले की त्याची दिशा दहावी नंतरच ठरते. विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्याचा (जवळपास ८०% विद्यार्थ्यांचा) एकमुखी निर्णय असतो तो **इंजिनिअरींग, मेडीकल, फार्मसी किंवा अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांना** प्रवेश घेण्याचा. या त्यांच्या मनातल्या सुप्त इच्छा आकांक्षाना खऱ्या अर्थाने रुप देण्यासाठी प्रवास सुरु होतो तो विद्यार्थी आणि पालकांचा.

शासन स्तरावर बदललेल्या शैक्षणिक धोरणानुसार २००० सालापासून १२ वी नंतर पुढील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी NEET/JEE/MHT-CET या प्रवेश परीक्षेंना फार महत्व प्राप्त झाले आहे. रेग्युलर कॉलेजमध्ये केवळ बोर्ड पॅटर्ननुसार Subjective तयारी करुन घेतली जाते. पण **NEET/JEE/MHT-CET** च्या दृष्टीने मार्गदर्शन देणे हा विषय चालू परिस्थितीचा अंदाज घेतला तर बदलत्या काळाची गरज म्हणून अत्यंत गरजेचा आहे.

प्रत्येक ट्रेड्नुसार असणारा विद्यार्थ्यांचा मर्यादीत कोटा व त्यामानाने तुलनात्मक मोठ्या प्रमाणावर असणारी विद्यार्थ्यांची संख्या या सर्व प्रकारात कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांची निकड तसेच राष्ट्रीय पातळीवरील विद्यार्थ्यांची होणारी चढाओढ यामध्ये आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा निभाव लागावा, राष्ट्रीय तसेच राज्य स्तरावरील विद्यार्थ्यांच्या स्पर्धेत NEET/JEE/MHT-CET चे आव्हान पेलण्याची क्षमता, आपल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अंगी यावी, यासाठी विद्यार्थी हा केंद्र बिंदू मानून त्याच्या विकासासाठी / गुणवत्तेसाठी नाविन्याची आस धरणाऱ्या **रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीने, अभ्यंकर कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयात NEET/JEE/MHT-CET मार्गदर्शनाकरिता सुयश अकॅडमी सुरू केली आहे.** जेणेकरून दोन वर्षात पूर्णतः तयारी होऊन जास्तीत जास्त स्कोअर करता येईल व आपल्याला व्यावसायिक करिअरसाठी अभिप्रेत असणाऱ्या ट्रेडसाठी ॲडमिशन मिळू शकेल. **विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधणे आणि त्याला नवीन ओळख देणे हा रत्नागिरीतीलच नव्हे तर संपूर्ण कोकणातील नामांकित शिक्षण संस्था म्हणून रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीचा परिचय आहे.**

महाविद्यालयामध्ये चालविल्या जाणाऱ्या या वर्गाचे स्वतंत्र विशेष नियोजन असते. यासाठी महाविद्यालयातील कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील निवडक तज्ज्ञ शिक्षकांकडून उत्तम मार्गदर्शन केले जाते. PCB साठी ३० आणि PCM साठी ३० अशी स्वतंत्र बॅच महाविद्यालयामध्ये चालविली जाते. यामध्ये NEET/JEE/MHT-CET ची विशेष तयारी करुन घेतली जाते. **भरपूर सराव साहित्य, तज्ज्ञ प्राध्यापक वर्गाने तयार केलेल्या प्रिंटेड नोटस, अंतिम परिक्षांच्या स्वरुपावर आधारीत सराव परीक्षांची, "कोटा राजस्थान मधील Zap Learning Solutios ची" गुणवत्तापूर्ण टेस्ट सिरीज तसेच गेस्ट लेक्चरर्स, Audio Visual माध्यमाच्या योग्य वापर, वैयक्तिक शंका सामाधान, उच्च दर्जाच्या अद्ययावत मार्गदर्शक पुस्तकांची स्वतंत्र लायब्ररी या पध्दतीने अत्यंत माफक फी मध्ये नियमित वेळापत्रकाप्रमाणे NEET/JEE/CET मार्गदर्शन केंद्र सुव्यस्थितपणे चालविले जाते. यातील विद्यार्थी प्रवेश हा मर्यादितच असतो.** प्रतिवर्षी लागणारा निकाल हा उत्साहवर्धक व भूषणावह असाच आहे, या संदर्भातील नियोजन प्रतिवर्षी काळजीपूर्वक केले जाते. महाविद्यालयात CET मार्गदर्शनाची व्यवस्था २००८ पासून सुरु केल्यानंतर प्रतिवर्षी परीक्षेत उज्वल यशाची परंपरा या मार्गदर्शन वर्गाने राखली आहे. विदयमान वर्ष २०२४ पासून NEET/JEE या विशेष स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन सुद्धा विद्यार्थ्यांना आपल्याच महाविद्यालयात (**एकाच छताखाली**) घेता येणार आहे. तरी संबधित विद्यार्थ्यांना या संधीचा उपयोग करुन घ्यायला हवा.

**प्राचार्य**

संपर्क
प्रा. चेतन मालशे, समन्वयक (८९९९३८९३७८)
श्री. रविंद्र कीर, व्यवस्थापक (९४२३८५६२६७)

## ❖ क्रीडास्पर्धा संबंधी माहिती

कनिष्ठ महाविद्यालयातील ११ वी व १२ वी या वर्गातील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी महाराष्ट्र शासनातर्फे पावसाळी व हिवाळी या दोन सत्रांमध्ये खालील खेळांच्या स्पर्धा आयोजित करण्यात येतात.

<u>पावसाळी सत्र</u>

कबड्डी, खोखो, टेबलटेनिस, पोहणे, व्हॉलिबॉल, फूटबॉल

<u>हिवाळी सत्र</u>

बास्केटबॉल, हॉकी, बॅडमिंटन, कुस्ती, जिमनॅस्टिक,
मैदानी स्पर्धा (ॲथलॅटीक्स)

<u>१९ वर्षाखालील विद्यार्थी / विद्यार्थिनींना वरील खेळामध्ये भाग घेता येईल.</u>

इ.१२ वी च्या विद्यार्थ्यांना बोर्डाने ठरवून दिलेल्या नियमांनुसार सवलतीने गुण देण्यात येतील. त्यासाठी क्रीडा शिक्षकांशी संपर्क साधणे आवश्यक आहे.

भविष्यात नोकरीच्या वेळी, वैद्यकीय शिक्षणक्रमामध्ये / खेळात भाग घेतलेल्यांना त्याचा फायदा होऊ शकतो. ज्या विद्यार्थ्यांना वरील खेळामध्ये भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी सोबतच्या अर्जात माहिती भरुन तो अर्ज प्रवेश अर्जासोबत द्यावा.

विविध क्रीडा प्रकारांचे संघ निवडण्यासाठी प्रथम चाचणी स्पर्धा घेण्यात येईल. संघात निवड झाल्यानंतर विद्यार्थ्यास तालुका, जिल्हा विभागीय व राज्य स्तरावरील स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी बाहेर गावी जाणे लागण्याची शक्यता आहे. ज्यांना बाहेरगावी जाणे शक्य होणार नाही त्यांनी संघाच्या निवडीच्यावेळी हजर राहू नये. विद्यार्थ्यांना संघात प्रवेश दिल्यानंतर सर्व स्तरावर भाग घेणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

---

## ❖ जात पडताळणी संदर्भात महत्वाची सूचना

इयत्ता १२ वी विज्ञान वर्गात शिकणाऱ्या व वैद्यकीय / अभियांत्रिकी / आर्कीटेक्चर या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती / विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागास प्रवर्ग / इतर मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात पडताळणी करणे आवश्यक असते.

अशा विद्यार्थ्यांसाठी जात पडताळणी समिती कार्यालयामार्फत महाविद्यालयात शिबिर आयोजित करुन त्यांचे अर्ज स्विकारले जातात तशा प्रकारची सूचना योग्य वेळी महाविद्यालयात प्रदर्शित करण्यात येते. याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

र.ए.सोसायटी

# रमेश कीर कला अकादमी

अभिनय, दिग्दर्शन, नाट्यतंत्र, सिनेमा–तंत्र..
यांचे प्रात्यक्षिकांसहीत परिपूर्ण ज्ञान देणारे कोर्सेस...



नविन वर्षासाठी प्रवेश सुरु

## कोर्सेस

१) नाट्य-सिनेअभिनय व नाट्यनिर्मिती प्रमाणपत्र अभ्यासक्रम
( दररोज ११ ते ०५, कालावधी एक वर्ष )

२) नाट्यनिर्मिती प्राविण्य पदविका अभ्यासक्रम
( दररोज ११ ते ०५, कालावधी दोन वर्ष )

३) अभिनय व नाट्यनिर्मिती प्रमाणपत्र अभ्यासक्रम
( दररोज ११ ते ०५, कालावधी ६ महिने.)

४) सुट्टीची ( शनिवार, रविवार ) स्वतंत्र बॅच उपलब्ध.




शैक्षणिक पात्रता दहावी
( वयाची मर्यादा नाही )

### शिकविल्या जाणाऱ्या गोष्टी

अभिनय कला आणि तंत्र,
कॅरॅक्टर बिल्डींग,
कॅमेरा टेक्निक्स्,
कथा-पटकथा-संवाद,
फाईट टेक्निक,
लिपमुमेंटस्,
डबिंग टेक्निक,
प्रि-प्रोडक्शन,
पोस्ट प्रोडक्शन,
कॅमेरा शॉट्स,
भूमिका बांधणी,
वाणी, आंगिक अभिनय,
वाचिक अभिनय,
सात्विक अभिनय,
आहार्य अभिनय,
रंगमंचाची संपुर्ण माहिती,
रंगमंच वावर आणि हालचाली,
प्रकाशयोजना,
नाट्यदिग्दर्शन रंगभुषा,
नाट्यलेखन,
अभिनयाची पुर्णतयारी,
योग साधना,
स्वरसाधना.

नामवंत अभिनेते, दिग्दर्शक, तंत्रज्ञ यांच्या आणि तज्ञ मंडळींचे गेस्ट लेक्चर आणि कार्यशाळा

### करिअर संधी

मालिका,चित्रपट,रेडिओ आर.जे.नेपथ्यकार,
कला दिग्दर्शन, प्रकाश योजनाकार,कलाशिक्षक,
टॉक शोज्, निवेदक, डबिंग

### वैशिष्ट्ये

- अभिनय, दिग्दर्शन, तंत्रज्ञ यांचा भरपूर सराव (दररोज २ ते ५ सक्तीची प्रॅक्टीकल्स)
- वर्षभरात २ एकांकिका दोन दिर्घांक, पथनाट्य आणि लघुपट निर्मिती, एक पूर्ण नाटक
- सर्व कलाकृतींचे (उदा. एकांकिका, लघुपट इ.) यांचे जिल्ह्यात-जिल्ह्याबाहेर सादरीकरण
- नामवंत व तज्ञ दिग्दर्शक, निर्माते यांच्याकडून ऑडीशन घेऊन त्यांच्या कलाकृतीमध्ये काम करण्याची संधी
- सिने-नाट्य सृष्टिसाठीच नाही तर संपूर्ण व्यक्तीमत्व विकास आणि सर्जनशील कलाकार घडविण्याचे कार्य

संपर्क – (०२३५२) २२४७१६ (कार्यालयीन वेळेत) रमेश कीर कला अकादमी
ओ.पी.जिंदल छात्रावास इमारत, गोगटे–जोगळेकर कॉलेज,रत्नागिरी